**योजनेचे नाव :- 15 वा केंद्रीय वित्त आयोग**

योजना कोणाची :- सदर योजना केंद्र शासनाची असून राज्य शासन व जिल्हा परिषद यांचेमार्फत ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या तिन्ही स्तरावर योजना राबविली जाते.

१. <u>योजनेची संक्षिप्त माहिती :-</u>

15 वा वित्त आयोगांतर्गत ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना त्यांच्या बळकटीकरणासाठी प्राप्त होणारा निधी हा ग्रामपंचायत (८०%) पंचायत समिती (१०%) व जिल्हा परिषद (१०%) या तिन्ही स्तरासाठी उपलब्धहोणार आहे. सदर आयोगाचाकालखंडदिनांक1 एप्रिल20 ते 31 मार्च 2025 असा आहे. 15 वित्त आयोगाचा निधी हा ग्रामपंचायतीस ८० %, पंचायत समितीस १०% व जिल्हा परिषदेस १०% या प्रमाणे वितरीत होते. ग्रामपंचायतीची लोकसंख्या या निकषानुसार निधी वितरीत होत असून जिल्हा परिषद कोल्हापूरला प्राप्त होणारा निधी ग्रामपंचायतींनी 15 वा केंद्रीय वित्त आयोगांतर्गत उघडणेत आलेल्या ICICI बँकेच्या खात्यावर ट्रेझरी BEAMS प्रणालीव्दारे 100% वर्ग होत आहे.

२. <u>योजनेचे निकष व अटी शर्ती :-</u>

15 वा वित्त आयोगांतर्गत प्राप्त होणारा निधी हा सन 2011 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या या निकषानुसार निधी वितरीत करणेत येत आहे.

३. <u>योजनेचे फायदे:-</u>

१. 15 वा केंद्रीय वित्त आयोगांतर्गत 80% निधी थेट ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध होणार असलेने ग्रामपंचायतीस निधी तात्काळ उपलब्ध होऊन त्या अंतर्गत ग्रामपंचायतीच्या गरजेनुसार व प्राधान्यक्रमानुसार विविध विकास कामे हाती घेऊन पूर्ण करणे शक्य होईल.

२. सदरचा निधी हा लोकसहभागीय नियोजन प्रक्रिया पूर्ण करुन गावसभेची अंतीम मान्यतेनंतर कामांची निवड होऊन ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणेत आलेला आहे. त्या अनुषंगाने प्राधान्यक्रमानुसार गाव विकासाची कामे ग्रामपंचायत स्तरावरच पूर्ण होऊन निधी खर्चदेखील ग्रामपंचायत स्तरावर होत असलेने निधी उपलब्ध होणेसाठी गावास विविध शासकिय विभागांकडे जाण्याची आवश्यकता भासणार नाही.

३. सदर योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणावर 5 वर्षांमध्ये निधी उपलब्ध होऊन गावस्तरावरील जनतेस माझे स्वप्नातील गाव ही संकल्पना राबविणेसाठी योजनेमध्ये वाव आहे.

४. पंचायत समिती स्तरावरील 10% निधीचा आराखडा तयार करून त्यास पंचायत समितीच्या सभेने मान्यता देवून कार्यवाही केली जाते. तसेच जिल्हा परिषद स्तरावरील १०% निधीचा आराखडा तयार करून सर्व साधारण सभेची मान्यता घेवून कार्यवाही केली जाते